दिनांक ०२/०२/२०२१

# प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक वाल्मीक माधवराव काळे, पद- सहकार अधिकारी, नेमणुक- मत्स व दुग्ध व्यवसाय कार्यालय, औरंगाबाद यांनी लाचेची मागणी करून २०,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | वाल्मीक माधवराव काळे, वय ५६ वर्ष, पद- सहकार अधिकारी, नेमणुक- मत्स व दुग्ध व्यवसाय कार्यालय, औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे क्रांतीचौक, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. संदीप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | २०,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या संस्था विरुद्ध प्राप्त तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदार यांच्या बाजुने चांगला रिपोर्ट देण्यासाठी व संस्थेवर प्रशासक न नेमण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | जालना रोडवरून श्रीनिकेतन कॉलनीकडे जाणाऱ्या रोडवर, औरंगाबाद |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांची मत्स्यव्यवसायाची संस्था असुन, त्यांचे संस्थे विरुद्धच्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने, त्यांचे संस्थेच्या बाजूने चांगला रिपोर्ट देण्यासाठी व त्यांचे संस्थेवर प्रशासक न नेमण्यासाठी सहकार अधिकारी वाल्मीक काळे, नेमणुक - मत्स्य व दुग्ध व्यवसाय कार्यालय, औरंगाबाद हे २०,०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, वाल्मीक काळे, सहकारी अधिकारी, नेमणुक - मत्स्य व दुग्ध व्यवसाय कार्यालय, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे २००००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, वाल्मीक माधवराव काळे, पद- सहकार अधिकारी, नेमणुक- मत्स्य व दुग्ध व्यवसाय कार्यालय, औरंगाबाद यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन २०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे क्रांतीचौक, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. संदीप राजपुत यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार अरूण उगले, दिगंबर पाठक, प्रकाश घुगरे यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

पोलीस उप अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

02/02/2021

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.

